# नबीरा महाविद्यालय, काटोल

# राष्ट्रीय सेवा योजना

# नियमित कार्यक्रम अहवाल

# 2017 - 2018

# राष्ट्रीय सेवा योजना

# नबीरा महाविद्यालय,काटोल

# अहवाल

# 2017- 2018

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाव्दारे 2017- 2018 या सत्रामध्ये नबीरा महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाला 100 स्वयंसेवकांची मंजुरी मिळाली. नोंदणी नंतर निवड झालेल्या सर्व स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्देशा बाबत व उपक्रमाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

दिनांक 12 / 07 / 2017 ला राष्ट्रीय सेवा योजना, न. म. वि. आणि नगर परिषद, काटोल यांच्या संयुक्त विद्यमाने काटोल शहरात 'वृक्षरोपण व वृक्षसंवर्धन जागृकता' कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी काटोल शहराच्या प्रथम नागरिक नगराध्यक्षा मा.सौ. वैशाली ठाकुर, नबीरा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एस. सातोकर व N.S.S. स्वयंसेवकांच्या शुभहस्ते काटोल शहरातील लक्ष्मी नगर भागात वृक्षरोपण करण्यात आले. या जागृकता अभियानाच्या यशस्वी आयोजनामध्ये वाणिज्य विभागाचे प्रमुख डॉ. एस. ए. सोनेगावकर, प्रा. डॉ. आर. जी. गोंगले, प्रा. डॉ. पुनित राऊत, प्रा. उमेश निसवादे, प्रा. सौरभ ढोरे, N.S.S. कार्यक्रम अधिकारी प्रा.मुकेश जाधव व N.S.S. स्वयंसेवक सहभागी होते.







**वृक्षरोपण करतांना स्वयंसेवक, काटोल शहराच्या नगराध्यक्षा मा. सौ. वैशाली ठाकुर, प्राचार्य डॉ. आर. एस. सातोकर व प्राध्यापक**

काटोल शहरातील नवरात्री महोत्सव पंचक्रोशीत प्रसिध्द आहे. हा महोत्सव पाहण्यासाठी हजारो भाविक काटोल शहरात येत असतात. त्या भाविकांना दिनांक 25 / 09 / 2017 ला राष्ट्रीय सेवा योजना, न. म. वि. व्दारे ‘पाणी वितरण’ करण्यात आले. या प्रसंगी शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष मा. निरंजनजी राऊत, प्रा. डॉ. आर. जी. गोंगले, प्रा. डॉ. पुनित राऊत, प्रा. संदीप जोगेवार ,प्रा. सौरभ ढोरे, N.S.S. कायर्क्रम अधिकारी प्रा.मुकेश जाधव उपस्थित होते.







**पाणी वितरण कार्यक्रमात सहभागी स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी व प्राध्यापक**

दिनांक 02 / 10 / 2017 ला ‘स्वच्छ भारत अभियान’ अंतर्गत N.S.S. च्या सर्व स्वयंसेवकांनी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एस. सातोकर, महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी महाविद्यालय परिसराची स्वच्छता व सुशोभीकरण करून या अभियानात कार्यशील सहभाग नोंदविला.









महाविद्यालय परिसराची स्वच्छता करतांना स्वयंसेवक, प्राचार्य डॉ. आर. एस. सातोकर, कार्यक्रम अधिकारी व प्राध्यापक

**राष्ट्रीय सेवा योजना, नबीरा महाविद्यालय, काटोल व्दारा '26 नोव्हेंबर - संविधान दिवस' साजरा**

राष्ट्रीय सेवा योजना, नबीरा महाविद्यालय, काटोल व्दारा 26 नोव्हेंबर - 'संविधान दिवस' या निमित्ताने दिनांक 26 नोव्हेंबर 2017 ला 'संविधान दिवस' साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरवातीला संविधान उद्देश पत्रिकेचे (प्रस्तावना ) वाचन व प्रास्ताविक N.S.S. कायर्क्रम अधिकारी प्रा. मुकेश जाधव यांनी केले. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. पुनित राऊत यांनी विध्यार्थ्यांना 'भारतीय राज्यघटना, भारतीय नागरिक - अधिकार व हक्क' या विषयावर मार्गदर्शन केले. कायर्क्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्रा. कपिल राऊत हे होते.





संविधान उद्देशपत्रीकेचे ( प्रस्तावनेचे ) वाचन करतांना कार्यक्रम अधिकारी प्रा. मुकेश जाधव, प्रा.कपिल राऊत, प्रा. डॉ. पुनित राऊत व स्वयंसेवक

अनेकदा वृक्षरोपण केल्यानंतर त्यांच्या संगोपनाची काळजी घेतांना दिसत नाही त्यामुळे वृक्षरोपण कार्यक्रमांची सांगता यशस्वी होत नाही. याच दृष्टीकोनातून दिनांक 25 / 01 /2018 ला नबीरा महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना, न. म. वि. व्दारे 'वृक्ष संवर्धन अभियान' राबविण्यात आले. या अभियाना अंतर्गत वृक्ष सद्दढ व

निकोप करण्यासाठी N.S.S. स्वयंसेवकांकडून महाविद्यालयातील वृक्षांना रंग रंगोटी, आळे करून पाणी देण्यात आले. स्वयंसेवकांनी या विषयाच्या बाबत त्यांच्याकडे असणाऱ्या कल्पनांचे आदान - प्रदान केले.





**महाविद्यालयातील वृक्षांना रंगरंगोटी करतांना स्वयंसेवक व प्राध्यापक**

अरविंद बाबू देशमुख महाविद्यालय भारसिंगी व्दारे राष्ट्रीय सेवा योजना विद्यापीठ स्तरीय शिबिरात सुप्रसिद्ध अभिनेता अमीर खान यांच्या 'पाणी फौंडेशन' च्या सहकार्यातून दिनांक 01 / 02 / 2018 ला आयोजित केलेल्या 'पाणी व्यवस्थापन : महत्व व दिशा' या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेमध्ये राष्ट्रीय सेवा योजना, न. म. वि. चे दहा स्वयंसेवक सहभागी झाले होते. या स्वयंसेवकांनी पाणी व्यवस्थापन विषयाचे महत्व व त्यांचे अनुभव इतर स्वयंसेवकांना कथन करून पाणी व्यवस्थापनाबाबतची जाणीव महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केली.

राष्ट्रीय सेवा योजना, न. म. वि. तील अनेक स्वयंसेवकांनी विविध महाविद्यालायाव्दारे आयोजित विद्यापीठस्तरीय व राज्यस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना शिबिरांमध्ये सक्रीय सहभाग नोंदवून आपला सर्वांगिण विकास राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून करण्याचा सात्यत्यपूर्ण प्रयत्न केलेला आहे.

धन्यवाद!

दिनांक - 16 / 04 / 2018

प्रा. मुकेश जाधव

कार्यक्रम अधिकारी

कायर्क्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, नबीरा महाविद्यालय, काटोल.

Principal
Nabira Mahavidyalaya,
Katol, Dist. Nagpur.